MHGA070001722025

**<u>दिवाणी न्यायाधिश (कनिष्ठ स्तर), अहेरी, जिल्हा- गडचिरोली यांचे न्यायालयात</u>**

<u>(पिठासिन अधिकारी श्री. एस.एम.एच. शाहिद)</u>

**<u>एम.जे.सी. क्रं. १०/२०२६ (ई-फाईलिंग प्रकरण)</u>**

**<u>अर्जदार</u>** :- भाग्यश्री राहुल दुर्गे,
वय ३३ वर्षे, व्यव. घरकाम,
रा. कोपरअल्ली, कोलसापुर, ता. मुलचेरा, जि. गडचिरोली.

**<u>विरूध्द</u>**

**<u>गैरअर्जदार</u>** :- सुशिला सुखदेव दुर्गे,
वय ५५ वर्षे, व्यव. घरकाम,
रा. वार्ड क्रं. ३ कोठारी, ता. बल्लारपुर, जि. गडचिरोली.

**उपस्थीती** :-

........................................................................................................

अर्जदारां तर्फे विद्वान अधिवक्ता - श्री. वाय.बी. मेश्राम,
गैरअर्जदार तर्फे विद्वान अधिवक्ता - श्री. एस.जी. हस्ते,

........................................................................................................

# <u>निशाणी क्रमांक ०१ खालील आदेश</u>

## <u>(दिनांक ०४ मे २०२६ रोजी पारीत)</u>

अर्जदाराने भारतीय वारसाण कायदा, १९२५, चे कलम ३७२ अन्वये वारसाण प्रमाणपत्र मिळण्यासाठी गैरअर्जदार विरूध्द अर्ज केलेला आहे. <u>मय्यत राहुल सुखदेव दुर्गे, यांचे दिनांक ०४/०६/२०२४ रोजी निधन झाले.</u> अर्जदार हि मय्यत राहुल सुखदेव दुर्गे, यांची पत्नी आहे. गैरअर्जदार हि मय्यत राहुल सुखदेव दुर्गे, यांची आई आहे. अर्जदारास मय्यत राहुल सुखदेव दुर्गे, हे मृत्यु पुर्वी वन विभाग, आलापल्ली येथे शासकीय सेवेत असल्याने मय्यताचे नावाने असलेल्या पुढील रक्कम अ.क्रं. १. भविष्य निर्वाह निधी रक्कम रू. २,००,०००/- (अक्षरी रूपये दोन लक्ष फक्त), अ.क्रं. २. सेवा उपदान रक्क्म रू. १,२५,०००/-(अक्षरी रूपये एक लक्ष पंचविस हजार फक्त), अ.क्रं. ३. रजा रोखीकरण रक्कम रू ६०,०००/- (अक्षरी रूपये साठ हजार फक्त) तसेच अ.क्रं. ४. एफ.डी.सी.एम. कार्मचारी सहकारी पतसंस्था, चंद्रपुर येथील जमा रक्कम रू. १,०६,२५६/- (अक्षरी एक दोन लक्ष सहा हजार दोनशे छप्पन फक्त) एकत्रीत एकुण रक्कम रू. ४,९१,२५६/- (अक्षरी रूपये चार लक्ष एक्कयान्नव हजार दोनशे छप्पन फक्त)

मिळण्याकरीता अर्जदार व गैरअर्जदार हे मय्यत राहुल सुखदेव दुर्गे, यांचे वारस असल्याबाबत वारसाण प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे अर्जदाराने सदर अर्ज दाखल केला आहे.

२. अर्जदाराचे अर्जावर जाहीरनामा प्रसिध्द करण्यात आला तसेच दैनिक "नवराष्ट्र" वृत्तपत्रामधून निशाणी क्रमांक ३५ प्रमाणे दिनांक ०५ एप्रिल २०२५ रोजी जाहीर नोटीस देण्यात आली तसेच निशाणी क्रं ७ प्रमाणे गैरअर्जदारास नोटीस पाठविण्यात आले. दिनांक १३/०६/२०२५ रोजी गैरअर्जदार न्यायालयात हजर झाले व नि २८ प्रमाणे दिनांक १४/०८/२०२५ रोजी लेखी उत्तर दाखल केले. अर्जदाराने आपल्या कथनाच्या समर्थनार्थ निशाणी क्र. ३० प्रमाणे अर्जदाराचे प्रतिज्ञापत्र दाखल केले. तसेच, जन्म मृत्यु अधिकारी धंतोली जोन क्रं. ४, नागपुर यांनी निर्गमित केलेले मय्यत राहुल सुखदेव दुर्गे, यांचे मृत्युप्रमाणपत्राची छायांकित प्रत निशाणी क्रं. ३१. एफ.डी.सी.एम.सह. पत संस्था यांचे दि ०९१२/२०२४ चे पत्राची छायांकित प्रत निशाणी क्रं. ३२. एफ.डी.सी.एम विभाग, आलापल्ली यांचे दिनांक १५/०१/२०२५ चे पत्राची छायांकित प्रत निशाणी क्रं ३३. अर्जदाराचे आधार कार्ड निशाणी क्रं. ३४ वर आहेत.

३. अर्जदार क्रं. १ हि मय्यत राहुल सुखदेव दुर्गे, यांची पत्नी आहे. अर्जदार क्रं. २ व ३ हे मय्यत राहुल सुखदेव दुर्गे, यांचे मुले आहेत. अर्जदार क्रं. ४ हि मय्यत राहुल सुखदेव दुर्गे, यांची आई आहे. पुढे असे की, अर्जदार क्रं. १ ते ४ शिवाय मय्यत राहुल सुखदेव दुर्गे, यांना इतर कोणीही वारस नसल्याचे प्रथमदर्शनी पुराव्यावरुन दिसुन येते. वारसाण प्रमाणपत्र देण्याबाबत ईतर कोणीही हरकत न घेतल्यामुळे अर्जदार क्रं. १ ते ४ हे मय्यत राहुल सुखदेव दुर्गे, यांचे वारस आहे अशी मान्यता देण्यात यावी असे या न्यायालयाचे मत आहे. सदर प्रकरण हे ई-फाईलिंग प्रणाली व्दारे दाखल करण्यात आले असुन प्रकरणाचे कोणतेही कागदपत्रे ( मुळ किंवा सत्यप्रति ) न्यायालयात उपलब्ध्द नाहीत. म्हणुण *“ माननिय मुंबई उच्च न्यायालय यांचे ई-फाईलिंग नियम २०२२ ” च्या नियम १०(३) मधील निर्देशानुसार संबंधित वकिलांनी प्रकरणाचे मूळ दस्त व कागदपत्रे त्यांचे कडे जतन करुण ठेवण्याचे निर्देश देण्यात येते.*

प्रकरणाच्या निकाला करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजुर.

२. अर्जदार क्रं. भाग्यश्री राहुल दुर्गे, व गैरअर्जदार सुशिला सुखदेव दुर्गे, हे मय्यत राहुल सुखदेव दुर्गे, यांची वारस आहे अशी मान्यता देण्यात येत आहे.

३. सदर वारसाण प्रमाणपत्र मय्यत राहुल सुखदेव दुर्गे, यांचे नावे अ.क्रं. १. भविष्य निर्वाह निधी रक्कम रू. २,००,०००/- (अक्षरी रूपये दोन लक्ष फक्त), अ.क्रं. २. सेवा उपदान रक्क्म रू. १,२५,०००/-(अक्षरी रूपये एक लक्ष पंचविस हजार फक्त), अ.क्रं. ३. रजा रोखीकरण रक्कम रू ६०,०००/- (अक्षरी रूपये साठ हजार फक्त) तसेच अ.क्रं. ४. एफ.डी.सी.एम.

कार्मचारी सहकारी पतसंस्था, चंद्रपुर येथील जमा रक्कम रू. १,०६,२५६/- (अक्षरी एक दोन लक्ष सहा हजार दोनशे छप्पन फक्त) एकत्रीत एकुण रक्कम रू. ४,९१,२५६/- (अक्षरी रूपये चार लक्ष एक्कयान्नव हजार दोनशे छप्पन फक्त) ची उचल करण्याकरीता जारी करण्यात येते.

४ वारसान प्रमाणपत्र जारी करण्याकरीता रक्कम रुपये ४,९१,२५६/- (अक्षरी रूपये चार लक्ष एक्कयान्नव हजार दोनशे छप्पन फक्त) करीता लागणारी स्टॅम्प ड्युटी घेवुन अर्जदार व गैरअर्जदार यांचे नावे संयुक्तीक वारसाण प्रमाणपत्र निर्गमित करण्यात यावे.

५. प्रकरणातील संबंधीत वकिल व पक्षाकारांना निर्देशित करण्यात येते की, “ माननिय मुंबई उच्च न्यायालय यांचे ई-फाईलिंग नियम २०२२ ” च्या नियम १०(३) मधील निर्देशाची पुर्तता करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SAJIDUZZAMAN SHAHID
Date: 2026.05.04 16:59:05 +0530

अहेरी
दि. ०४/०५/२०२६

(एस.एम.एच. शाहीद)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अहेरी.